**संक्षिप्त फौजदारी केस नं. ५०/२०२३**
**नि. क्र. ४२**

**<u>अभियोगपक्षातर्फे साक्षीदार क्र. ०६ चा जबाब शपथेवर सुरु.</u>**

**नाव** – संकेत संजय गांधी,

**वय**– २७ वर्षे , **व्यवसाय** – हॉटेल व्यवसाय,

**राहणार**– कोंडगाव, साखरपा, ता. संगमेश्वर, जि.रत्नागिरी.

**<u>अभियोगपक्षातर्फे सरतपास सहाय्यक सरकारी अभियोक्ता श्री. ए. एल. दड्डेकर यांचेकडून</u> –**

**०१.** दिनांक २९/१०/२०२२ रोजी मी साखरपा, कोंडगाव येथे माझ्या घरी हजर होतो. त्यादिवशी मी माझ्या घरातून माझ्या हॉटेलमध्ये जात असताना हॉटेलच्या मागे अंदाजे २०० मीटर अंतरावर कोल्हापूर–रत्नागिरी महामार्गावर एक अपघात झाला होता. तो पाहण्यासाठी मी तेथे थांबलो होतो. तेथे रत्नागिरीकडून कोल्हापूरकडे जाताना रस्त्याच्या डाव्या बाजुला गटारीमध्ये अपघात झालेली व्हॅग्नार गाडी होती. दुसरे अपघातग्रस्त वाहन तेथे नव्हते. मी पाहिले त्यावेळी तेथे फक्त गाडी होती. त्या गाडीमध्ये कोणीही नव्हते.

**०२.** तेथे जमा झालेले लोकांमध्ये चर्चा सुरु होती. परंतु, मी तेथे फार वेळ थांबलो नाही. सदर गाडीमधील इसम हा माझ्या नातेवाईकाचा पती असल्याचे तेथे मला फक्त कळाले होते. अपघात पाहिलेल्या लोकांनी त्या इसमाला उपचारासाठी हॉस्पिटलमध्ये पाठविल्याचे मला तेथे कळाले होते. त्याव्यतीरीक्त त्यांनी मला काहीही सांगितले नाही. असे काही झाले नाही की, पोलिसांनी माझ्याकडे चौकशी करुन माझे तपासटिपण नोंदवले होते.

*(साक्षीदार पूर्वीच्या जबानीशी विसंगत साक्ष देत असल्याने सहा. सरकारी अभियोक्ता यांनी साक्षीदारास उलटतपासाच्या स्वरुपात प्रश्न विचारण्याची परवानगी मागितली, परवानगी मंजूर.)*

०३. *(साक्षीदारास त्याच्या तपासटिपणातील चिन्हांकीत भाग अ कडील मजकुर त्याला वाचुन दाखविण्यात आला)*. सदरचा मजकुर खरा नाही. हे म्हणणे खरे नाही की, आरोपी माझा नातेवाईक असल्याने त्याला मदत करण्यासाठी आज रोजी मी खोटी साक्ष देत आहे.

**सरतपास पुर्ण.**

**उलटतपास – आरोपीतर्फे विधीज्ञ श्री. एस. सी. आठल्ये यांच्याकडुन –**

**०४.** हे म्हणणे खरे आहे की, अपघात कसा झाला हे मी प्रत्यक्ष पाहिला नाही. हे म्हणणे खरे आहे की, त्यामुळे अपघात कोणाच्या चुकीमुळे व कसा घडला हे मला सांगता येणार नाही.

**उलटतपास पुर्ण.**

**फेरतपास नाही.**

श्रवणोत्तर निवेदन स्विकृत,

ROHINI RAJENDRA KULKARNI

Digitally signed by ROHINI RAJENDRA KULKARNI
Date: 2026.08.05 18:24:54 +0530

**(रोहिणी आर. कुलकर्णी)**

दि. ०५.०८.२०२६ न्यायदंडाधिकारी वर्ग–१ देवरुख,

स्थळः देवरुख जि. रत्नागिरी.

-:CERTIFICATE:-

I affirm that the contents of this Pdf file order are same words as per original order.

| | | |
|---|---|---|
| Name of Stenographer | :- | A. A. Shivalkar. |
| Court Name | :- | The Court of Civil Judge (J.D.) & Judicial Magistrate F.C., Deorukh |
| Date | :- | 05/08/2026 |
| Evidence signed by PO. on | :- | 05/08/2026 |
| Evidence uploaded on | :- | 05/08/2026 |